# प्रबंध, ध्रुपद आणि ख्याल

## अशोक दामोदर रानडे

(मूळ प्रसिद्धी - महाराष्ट्र टाईम्स वर्तमानपत्र, संपा. द्वा. भ.कर्णिक, मुंबई, ०८ जून, १९७५)
(प्रबंध, ध्रुपद आणि ख्याल, म. वा. धोंड, मराठी संशोधन मंडळ, १७२, मुं. म. ग्रंथसंग्रहालय मार्ग, दादर, मुंबई-१४. पृष्ठे ४०, मूल्य २ रु.)

साहित्यिकांनी संगीतविचारास पुढे सरसावणे ही क्रिया महाराष्ट्रास परकी नाही. प्रा. म. वा. धोंड यांची पुस्तिका ही या प्रकारची आणि एक स्वागतार्ह भर.

शब्द, त्यांचे बदलते अर्थ आणि त्याने सूचित होणाऱ्या सामाजिक, सांस्कृतिक घटना यांच्या अभ्यासामुळे संगीतविचार पुढे नेण्यास एका बाबतीत साहित्यिकांची चांगली गती असते. प्रा. धोंडांचा विशेष अभ्यासाचा विषय जुने मराठी वाङ्मय असल्याने त्याच्या प्रयत्नास 'भाषिक' पाठबळ चांगले आहे.

प्रबंध, ध्रुपद आणि ख्याल या तीन हिंदुस्थानी संगीतप्रकारांचा इतिहास व्युत्पत्ती, भाषा, वाङ्मयीन संदर्भ वा वाङ्मयीन इतिहास यांच्या आधारे (मुख्यतः) शोधून प्रा. धोंड आपले निष्कर्ष काढतात. 'ख्याल गायकी मुसलमानी नव्हे.' 'ध्रुपदगायकी प्रबंधगायकीहून वेगळी नव्हे'. 'ख्याल गाणाऱ्या स्त्रिया कलावंतिणी इ. असत, म्हणून ते गायन असभ्य मानले गेले'. 'आजचा बडा ख्याल ध्रुपदातून व छोटा ख्याल ठुमरीतून आला'. हे त्यांचे प्रमुख निष्कर्ष होत.

निष्कर्ष नवीन नाहीत हे त्यांनी दिलेल्या अवतरणांवरून लक्षात यावे. पण या निष्कर्षांना सैध्दांतिक अंतिमता आणण्याकडे त्यांचा कल दिसतो. त्यात आणि प्रा. धोंडांचे चुरचुरीत लिहीणे. यामुळे पुस्तिका विनाकारण वादविषय ठरण्याची शक्यता वाढते.

- **मेलेल्याला मारले**

थोडक्यात पुस्तिकेवरील आक्षेप नोंदवायचे तर असे म्हणता येईल की मुळात प्रा. धोंडांनी ज्या संगीत-ग्रंथांतील विधानांना असत्य, अनैतिहासिक म्हणून झोडले आहे ती संगीतेतिहासाची मान्य व स्वीकृत पुस्तके नाहीत. त्यामुळे "अमीर खुस्रोने ख्याल निर्माण केला." हा सिध्दांत खोडून काढण्यात त्यांनी मेलेल्याला मारण्याचेच कार्य केले आहे.

रागगामे इत्यादी परकीय म्हणून काही ख्याल परकीय होत नाही असे ते (काही अनावश्यकपणे विनोदी) उदाहरणे देऊन मांडतात. परकीय रागनामे हा संगीतविचारात एक पुरावा मानला गेला आहे. नाव व राग यांच्यातील संबंध, केवळ व्युत्पत्तीवरून ठरविता यायचा नाही. झीलफ, बाखरेज, इ. नावे जशी परकीय तशीच त्यांची स्वररूपेही परकी वाटल्यामुळे तत्कालीन ग्रंथकारांनी हे राग परकी असे मत मांडले असावे. यासाठी पर्शिया, अरबस्तान इ. देशांच्या संगीताचा अभ्यास व्हायला हवा व मग तुलना, केवळ भाषिक पुराव्यावरून सांस्कृतिक वा सांगीतिक निष्कर्ष काढू पाहणे हे जरा घिसाडघाईचेच होय.

कव्वालापासून ख्याल या विधानांवरही प्रा. धोंड जरा जरूरीपेक्षा अधिकच घसरले आहेत. ध्रुपदापेक्षा ख्यालात ज्या गोष्टी वेगळया त्या निरनिराळया गायनप्रकारातून आल्या असाव्यात हे अंदाज निरनिराळया विधानातून मांडले गेले आहेत. वरील विधान त्याच धर्तीचे. ख्याल म्हणजे क्रीडा असे म्हणण्यातही प्रा. धोंड काही नवीन सांगत नाहीत. ध्रुपदापेक्षा ख्यालात अधिक मोकळीक, स्वातंत्र्य असते इथपासून ते ध्रुपदात जोरकसपणा, ठोसपणा, मर्दानी लढतीची लयकारी असते व ख्यालात नाजुकपणा, बारकाईचे काम आणि नखरा यांचा आढळ होतो असे अनेक बोलके दंडक ख्यालसंगीताच्या मौखिक परंपरेत रूढ आहेत.

- **संगीताचे दंडक**

मुख्य मुद्दा असा की संगीताच्या विकासाच्या व बदलत्या स्वरूपाच्या खुणा केवळ वाङ्मयात पाहून त्याविषयी निष्कर्ष काढणे ही पध्दतच मुळी गफलतीची आहे. संगीताचे वाङ्मयीन उल्लेख आधार म्हणून वापरताना खुद्द संगीताच्या विकासाचे स्वतःचे म्हणून दंडक असतात तेही पाहिले जावेत. सांगीतिक संज्ञांची व्युत्पत्ती वगैरेवर आधारलेली स्पष्टीकरणे संगीत व संगीतसंज्ञा एकाच वेगाने व प्रमाणात बदलतात असे गृहीत धरून दिली जातात. हे बरोबर नाही. होनाजीने 'गुणीजन' ही संज्ञा तांत्रिक अर्थाने वापरली इत्यादी निष्कर्ष काढायला अधिक पुरावा हवा. संगीतकारांनी वाङ्मय व इतिहास नीट तपासला नाही ही प्रा. धोंडांची तक्रार, तर प्रा. धोंड स्वत: संगीत नीट तपासत नाही ही संगीतकारांनी तक्रार असे द्वंद्व होण्यापेक्षा दोघांनी मिळून जुन्या वाङ्मयातले संगीतविषयक उल्लेख तपासण्याचे काम करावे. हे काम अधिक जरूरीचे व फलदायक होईल.